# शिवाजी विद्यापीठाची नवीन अभ्यासिका खुली

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाची नवीन विस्तारित अभ्यासिका विविध अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी मंगळवारपासून खुली करण्यात आली.

या अभ्यासिकेची सकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी पाहणी केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी एन. व्ही. कोंगळे, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, आदी उपस्थित होते. दरम्यान, या अभ्यासिकेबाबत ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी सांगितले की, विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांनाच या अभ्यासिकेत प्रवेश देण्यात येईल. प्राथमिक टप्प्यात सकाळी साडेदहा ते सहा यावेळेत याठिकाणी विद्यार्थ्यांना बसता येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे. ओळखपत्र प्राप्त झाले नसल्यास अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेली अथवा शुल्क भरल्याची पावती दाखवून अभ्यासिकेत बसता येईल. (प्रतिनिधी)